वर्ष-०८ | अंक-२७ | मुंबई, मंगळवार २४ ते ३० मे - २०२२ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2
महत्वाच्या कामांसाठी परदेशी जाणा-या नागरिकांकरिता प्रिकॉशन डोसच्या कालावधीत घट

3 → मनोरुग्ण तरुणाची गळा आवळून हत्या, वर्ध्यातील आर्वी येथील घटनेने खळबळ

राज्यसभेसाठी शिवसेनेच्या उमेदवाराला काँग्रेस पाठिंबा देणार - नाना पटोले ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

# 57 गुन्हात जप्त 411 किलोचे अमली पदार्थ पोलिसांनी केले नष्ट



नागपूर - गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने वेगवेगळ्या कारवाई दरम्यान जप्त केलेले अमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत. एकूण 57 गुन्ह्यात जप्त गांजा,ड्रग्स सह 411 किलोचे अमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत,त्याची बाजारात किंमत 1कोटी 75 लाख रुपये इतकी आहे.

गेल्या काही काळापासून गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने गांजा आणि एम.डी ड्रग्स तस्करांच्या विरोधात मोहीम सुरू केली आहे. मधल्या काळात शहरात मोठ्याप्रमाणात गांजा आणि ड्रग्स पोलिसांच्या मालखाण्यात जमा झाला होता. जप्त करण्यात आलेले अंमली पदार्थ साठवून जास्त दिवस सुरक्षित ठेवणे कठीण असते त्यामुळे ते अमली पदार्थ वेळोवेळी नष्ट करावे लागतात. 411 किलो मुद्देमाल नष्ट - मागील काही काळात नागपूर शहर पोलिसांनी अमली पदार्थ तस्करांच्या विरोधात धडक कारवाई सुरू केली आहे. त्यापैकी 57 गुन्ह्यात पकडण्यात आलेले 411 किलो अमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत. नष्ट करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत 1 कोटी 75 लाख रुपये पेक्षा जास्त आहे.

समितीच्या शिफारशी नंतर मुद्देमाल नष्ट केला जातो - अमली पदार्थ केव्हा आणि कसे नष्ट करावे हे निश्चित पोलिसांची एक समिती आहे. या समितीमध्ये पोलीस विभागातील वरिष्ठ दर्जाचे अधिकारी असतात. त्यांच्या मार्गदर्शनचं जप्त करण्यात आलेले अमली पदार्थ नष्ट केले जातात.

# डोंबिवलीत सोनसाखळी चोरण्यासाठी रिक्षाने निर्जनस्थळी नेलं

## १३ वर्षाच्या मुलाने धावत्या रिक्षातून उडी मारली अन् त्यानंतर...

डोंबिवली पश्चिमेतील देवी चौकात राहणाऱ्या एका १३ वर्षाच्या तबला वादकाला लुटणाऱ्या रिक्षाचालकाला विष्णुनगर पोलिसांनी अटक केली आहे. रिक्षाचालक सम्राट अनंत मगरे (१९) हा सिद्धार्थनगर झोपडपट्टीत राहतो. त्याने




युवा तबला वादकाला लुटल्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीची सोनसाखळी आणि चोरीसाठी वापरलेली रिक्षा विष्णुनगर पोलिसांनी जप्त केली आहे. डोंबिवली पश्चिमेतील देवी चौकात मोहन भोईर यांचे कुटुंब राहते. मोहन यांचा मुलगा साई (१३) तबला शिकण्यासाठी भागशाळा मैदानातील एका खासगी शिकवणी वर्गात नियमित रिक्षेने येजा करतो. गेल्या बुधवारी रात्री आठ वाजता शिकवणी संपली. साईने घरी जाण्यासाठी भागशाळा मैदानाजवळ एक रिक्षा पकडली. रिक्षाचालक सम्राट मगरेने साईच्या गळ्यातील सोनसाखळी बघितली. तो लुटण्याचा विचार त्याच्या मनात आला. रिक्षाचालक सम्राटने तबला वादक साई भोईरला रिक्षात घेतले. सम्राटला साईच्या गळ्यातील सोनसाखळी लुटायची असल्याने त्याने भागशाळा मैदानाकडून रिक्षा ठाकुर्ली पुलाकडील निर्जन झाडेझुडपे असलेल्या रस्त्याने नेली. साईने चालकाला मला देवी चौकात जायचं आहे. तुम्ही रिक्षा चुकीच्या दिशेने नेत आहात असे सुचविले. आपणास एका मित्राला सोबत घ्यायचे आहे असे सांगून चालक सम्राटने रिक्षा ठाकुर्ली पुलाकडील बावनचाळ निर्जन ठिकाणी नेली. तिथे सम्राटने साईच्या गळ्यातील सोनसाखळी काढून घेतली. साईने त्याला विरोध केला. ही सोनसाखळी लहान मुलाने घालायची नसते. ती आपण तुझ्या आईच्या हातात देणार आहोत, असे सांगून सम्राटने रिक्षा पुन्हा देवी चौकाकडे नेली.

साईच्या आईने ...पान २ वर...

# प्रेमाची फूस लावून अल्पवयीन विद्यार्थिनीला पळवलं

## 20 दिवसानंतर आरोपी शिक्षकाला अटक



कल्याण येथील मांडा-टिटवाळा भागात खासगी शिकवणी घेणाऱ्या एका शिक्षकाने शिकवणीसाठी येणाऱ्या एका १३ वर्षाच्या विद्यार्थिनीला प्रेमाची फूस लावून उत्तरप्रदेशातील मूळ गावी पळवून नेनेल्याची घटना उघडकीस आली आहे. या संशयित आरोपी शिक्षकाचा मोबाईल गेली अनेक दिवस बंद असल्याने पोलीस त्याचा माग काढू शकत नव्हते. अखेर वीस दिवसांनी संबंधित शिक्षकाचे मोबाईलचे भौगोलिक ठिकाण (जीपीएस) उत्तरप्रदेशातील फरीदाबाद रेल्वे स्थानक परिसरात असल्याची माहिती टिटवाळा पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी फरिदाबाद पोलिसांच्या साहाय्याने आरोपी शिक्षकाला राहत्या घरातून अटक केली. ललित चौधरी असं खासगी शिकवणी चालकाचं नाव आहे. तो टिटवाळा भागात खासगी शिकवणी घेतो. त्याच्या वर्गात एक १३ वर्षांची मुलगी शिकवणीसाठी येत होती. ललित चौधरीने तिला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढलं. ...पान २ वर...

# 12 गुन्हेगारांविरोधात मोक्का अंतर्गत कारवाई, आठ आरोपीना अटक




मागील काही दिवसापासून कल्याण-डोंबिवलीत वाढलेल्या सामूहिक गुंडगिरी विरोधात कल्याण परिमंडळ तीनचे पोलिस उपायुक्त सचिन गुंजाळ यांनी महत्वपूर्ण कारवाईचे निर्देश दिले आहेत. वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सराईत गुन्हेगारांविरोधात एमपीडीए अंतर्गत कारवाई केल्यानंतर आता कल्याण कोळसेवाडी पोलिसांनी एका खंडणीच्या गुन्ह्यात अटक केलेल्या आणि सहभागी असलेल्या अशा 12 आरोपी विरोधात मोक्का अंतर्गत कारवाई केली आहे. एकाचवेळी 12 आरोपींवर मोक्का लावण्याची कल्याणमधील ही पहिलीच घटना आहे.

कल्याण-डोंबिवलीत चोरी, घरफोडी, मारहाण, रात्रीच्या सुमारास दंगल करणे, वाहनांची तोडफोड, आदी प्रकारच्या गुन्ह्यांत वाढ झाली आहे. विशेषत: कल्याण पूर्व भागात तर गेल्या काही दिवसांपासून स्थानिक गावगुंडांनी दहशत माजविण्याचा प्रयत्न केला आहे. रस्त्यावर तलवारी, लोखंडी सळई, दांडके घेऊन फिरणे, बर्थडे पार्टी दरम्यान फायरिंग करणे, आदी अनेक प्रकार घडले आहेत. या पार्श्वभूमीवर डीसीपी सचिन गुंजाळ यांनी या गुन्हेगारीला आळा घालण्याकरिता कल्याणचे एसीपी उमेश माने-पाटील आणि डोंबिवलीचे एसीपी जय मोरे यांना गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या नुसार 14 एप्रिल रोजी कल्याण पूर्वेत पडलेल्या दरोडा आणि मारहाणीच्या गुन्ह्यात पोलिसांनी 12 आरोपी विरोधात गुन्हा दाखल करत यातील 8 आरोपीना अटक केली आहे.

यातील एक आरोपी अल्पवयीन आहे, तर उर्वरित आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत. असून या सर्व आरोपी विरोधात हत्या, अपहरण, खंडणी, जबरी चोरी, धमकवण्या सारखे गुन्हे दाखल आऊन प्रत्येक आरोपी विरोधात 12 ते 17 गुन्हे दाखल असल्याने हे सर्व आरोपी सराईत गुन्हेगार असल्याचे स्पष्ट होत आहे. या सर्व आरोपी विरोधात सामूहिक गुन्हेगारी विरोधी कायद्या अंतर्गत ( मोक्का ) अंतर्गत कारवाई करण्यात आल्याचे एसीपी उमेश माने पाटील यांनी सांगितले. यातील आठ आरोपिना पोलीसानी अटक केली आऊन उर्वरित चार आरोपीचा शोध सुरू आहे.

# सोलापूर शहरात पुन्हा चेन स्नॅचिंग



सोलापूर - शहरात दोन दिवसांत दुसऱ्यांदा चेन स्नॅचिंगचा प्रकार घडला आहे. २० एप्रिलला शेळगी परिसरात अशीच घटना घडली होती. तत्पूर्वी, १८ मे रोजी प्रिती चिदानंद भावी (रा. हुमानबाद, जि. बिदर) यांच्या गळ्यातील दागिने दुचाकीवरून आलेल्या तरूणाने पळवून नेले आहे. भावी यांनी विजापूर नाका पोलिसांत फिर्याद दिली असून पोलिस चोरट्याचा शोध घेत आहेत. चाटला साडी सेंटर ते शेळगीतील भीम नगर या रोडवर मंगल राजकुमार पांढरे यांच्या गळ्यातील २७ हजारांचे गंठण मागून आलेल्या दुचाकीस्वाराने हिसकावून नेले होते. २० एप्रिल रोजी ही घटना घडली होती. त्याचा तपास जोडभावी पेठ पोलिस अजूनही करीत आहेत. तेवढ्यातच दुसरी घटना घडली आहे. दरम्यान, प्रिती भावी या त्यांच्या मावस भावाच्या विवाहासाठी हुमानाबादहून सोलापुरात आल्या होत्या. जगदिश मंगल कार्यालयातून त्या मामाच्या मुलीच्या घरी जात होत्या. वसंत नगरातील गणपती मंदिरासमोर आल्यानंतर मागून आलेल्या दुचाकीस्वाराने ...पान २ वर...

# औरंगाबाद पुन्हा हादरलं!

## व्यापाऱ्याचा पत्नीसह कुजलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह





एकाच दिवसात तीन हत्यांच्या घटनेनंतर चर्चेत आलेलं औरंगाबाद शहर पुन्हा एकदा हादरले आहे. शहरातील पुंडलिकनगर भागात राहत्या घरात पती-पत्नीचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. घटनासथळी पोलिसांचे पथक दाखल झाले असून, मृतदेह उत्तर तपासणीसाठी शासकीय घाटी रुग्णलायत हलवण्यात येत आहे. हिरालाल कलंत्री ( 55 ) आणि किरण शामसुंदर कलंत्री (45) अशी मृतांची नावे आहेत. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सकाळी ( सोमवारी ) कलंत्री यांच्या घरामधून दुर्गंधी येत असल्याने स्थानिक नागरिकांनी पुंडलीकनगर पोलिसांना याची माहिती दिली.

त्यामुळे पोलिसांनी घटनसथळी जाऊन पाहणी केली असता, पती-पत्नीचे मृतदेह वेगवेगळ्या मजल्यावर पलंगाखाली लपवून ठेवल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे हि खुनाची घटना असल्याचा संशय पोलिसांना आहे. तर त्यांचा मुलगा घटना घडल्यापासून फरार असून त्याचा फोन सुद्धा लागत नसल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. त्यामुळे पोलिसांकडून त्यादृष्टीने तपास सुरु झाला आहे.

औरंगाबाद बनतोय 'क्राईम कॅपिटल'

गेल्या काही दिवसांपासून औरंगाबाद शहरात खुनाच्या घटनेत वाढ होताना पाहायला मिळत आहे. गेल्या 22 दिवसात औरंगाबाद शहरात सात खुनाच्या घटना घडल्याचे समोर आले. त्यात आणखी पती-पत्नीचा मृतदेह आढळून आल्याने शहारत खळबळ ...पान २ वर...

# तबेल्यात घुसून सपासप वार करत जनावरांची हत्या करणाऱ्या आरोपीला बेड्या




भिवंडी शहरातील बंदर मोहल्ला भागात असलेल्या म्हशींच्या तबेल्यातील म्हशी आणि रेड्यांवर प्राणघातक हल्ला करून कत्तल करणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळण्यात निजामपुरा पोलिसांना यश मिळाले आहे. फाजिल हुसेन रफिक अहमद कुरेशी वय 20 वर्षे, रा .कसाई वाडा, कुरेशी नगर, भिवंडी असे जनावरांची कत्तल केलेल्या आरोपीचे नाव आहे. विशेष म्हणजे फाजील हा फिर्यादी अरहम यांच्या ओळखीचा देखील असून त्यानेच हे कुकर्म केल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. तबेला सुरू करताना अरहम साजीद मोमीन यास जनावरे खरेदी करून देताना आरोपी फाजिल हुसेन रफिक अहमद कुरेशी याने किमान दहा ते बारा लाख रुपयांचा फायदा करून दिला होता. त्यातून तो तबेला मालकाकडे पैशांची मागणी करत होता. ते देण्यास तबेला मालकाने नकार दिल्याने त्या रागातून आरोप फाजिल हुसेन रफिक अहमद कुरेशी याने खरेदी करून दिलेली जनावरांना नुकसान देण्याच्या उद्देशाने हल्ला केला. तबेल्यात घुसुन सुऱ्यानं जनावरांवर सपासप वार केला. यात 7 जनावरांची हत्या तर 13 जनावरांना गंभीर जखमी केले होते. ...पान २ वर...

# नाशिक:पोलिस ॲक्शन मोडमध्ये



नाशिक : शहरात खुनाच्या घटनांसह हाणामारी व अन्य गुन्ह्यांत वाढ झालेली असताना पोलिस आता ॲक्शन मोडमध्ये आलेली आहे. अट्टल गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी मध्यरात्री कोम्बिंग ऑपरेशन करण्यात आले. यामध्ये हिस्ट्री शिटर, तडीपार आढळून आले असून, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. पोलिस आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर आता जयंत नाईकनवरे यांनी शहरातील गुन्हेगारी बीमोड करण्यासाठी पोलिस दलाला सक्रिय केले आहे. गेल्या काही दिवसांत गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी खाक्या दाखविताना अट्टल गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी कॉम्बिंग ऑपरेशन राबविले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता ज्या पोलिस ठाण्यांच्या हद्दीत खुनाच्या घटना घडल्या आहेत, या क्षेत्रात गुन्हेगारांवर वचक ठेवण्यासाठी कोम्बिंग ऑपरेशन राबविण्याचे आदेश पोलिस आयुक्त जयंत नाईकनवरे यांनी दिले. त्यानुसार मध्यरात्री एक ते पहाटे चार या वेळेत गुन्हेगारांचा शोध घेण्यात आला.

मोहिमेत दोन सहायक पोलिस आयुक्त, २१ पोलिस अधिकारी, ११० पोलिस अंमलदारांसह दंगल नियंत्रण पथक, जलद प्रतिसाद पथकाने सहभाग नोंदविला होता. दरम्यान, यापुढील काळातही शहरात कोम्बिंग ऑपरेशन मोहीम राबविली जाणार असल्याचे पोलिस विभागातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

### तीन तडीपार, रेकॉर्डवरील दहा गुन्हेगारांची धरपकड

कारवाईदरम्यान तडीपार असतानाही शहरात वावरतांना तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. तसेच रेकॉर्डवरील दहा गुन्हेगारांचीही धरपकड केली आहे. जामीनपात्र व अजामीनपात्र गुन्ह्यांमध्ये पोलिस शोधात असलेल्या सहा गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

# आरोग्यमंत्र्यांचे कोरोनाच्या चौथ्या लाटेबद्दल मोठे वक्तव्य



नागपूर - राज्यात सध्याच्या घडीला केवळ कोरोनाच्या चौथ्या लाटेची चर्चा सुरू आहे. पण त्यात तथ्य नाही, राज्यात आजच्या घडीला केवळ 1950 रुग्ण आहे. जिथे महाराष्ट्राने 65 हजार केसेस रोज पाहिल्या आहेत, त्या तुलनेत 200 रुग्ण मिळणे हे फार काही काळजी करण्याची गरज नाही, असे मत आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी व्यक्त केले. ते नागपुरात रवी भवन येथे बोलत होते.राज्यात मोठ्या प्रमाणात कार्यक्रम होत आहेत. राजकीय सभा, लग्न समारंभ, मेळावे होत आहेत, लोक गर्दी करत असताना देखील अपेक्षित रुग्ण वाढ झालेली नसल्याने चौथ्या लाटेची सुतराम शक्यता दिसत नसल्याचेही राजेश टोपे म्हणाले. बुस्टर डोजबाबत केंद्राच्या सुचना आहेत, त्यानुसार बुस्टर डोज देत आहेत, ॲटीबिाडीजची टेस्ट करुन लोक बुस्टर बाब निर्णय घेत आहेत.माजी गृहमंत्री अनिल देशमुखांच्या मतदार संघात दौरा - आरोग्यमंत्री आज नागपुरात दौऱ्यावर आहेत. काटोल मतदार संघात जाणार आहेत. कार्यकर्त्यांचे म्हणणे एकूण घेऊन सगळ्या पदाधिकरी ...पान २ वर...

# महत्वाच्या कामांसाठी परदेशी जाणा-या नागरिकांकरिता प्रिकॉशन डोसच्या कालावधीत घट

कोव्हीड 19 लसीकऱणातील सुयोग्य नियोजनामुळे 18 वर्षावरील नागरिकांचे दोन्ही डोस 100 टक्के पूर्ण करणारी नवी मुंबई ही राज्यातील पहिली महानगरपालिका ठरली असून सद्यस्थितीत 18 वर्षावरील सर्व लाभार्थ्यांना दुसऱ्या डोसनंतर 9 महिने किंवा 39 आठवडयांनी प्रिकॉशन डोस देण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जे भारतीय नागरिक रोजगारासाठी, परेदशातील क्रीडा स्पर्धांसाठी, भारताच्या अधिकृत शिष्टमंडळाचा भाग म्हणून व्दिपक्षीय अथवा बहुपक्षीय बैठकांमध्ये सहभाग घेण्यासाठी, परदेशातील व्यावसायिक बांधिलकी असणा-या बैठकांसाठी (Employment opportunities, participation in sports tournaments in foreign countries, participation in bilateral, multilateral meetings as part of India's official delegation, for attending business commitments in foreign countries ) परदेशी जाणार असतील अशा व्यक्तींसाठी दुसऱ्या डोसमधील आणि प्रिकॉशन डोसमधील कालावधी कमी करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने कोविन पोर्टलवरही बदल करण्यात आलेला आहे.

याकरिता मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या असून (1) सद्यस्थितीत आरोग्यकर्मी, पहिल्या फळीतील कोरोना योध्दे, 60 वर्षावरील ज्येष्ठ नागरिक हे लाभार्थी शासकीय (मोफत) किंवा खाजगी सीव्हीसीच्या ठिकाणी रक्कम भरून प्रिकॉशन डोस घेऊ शकतात. 60 वर्षापेक्षा कमी ते 18 वर्ष वयाचे लाभार्थी फक्त खाजगी सीव्हीसी सेंटरला प्रिकॉशन डोस घेण्यासाठी रक्कम भरून पात्र आहेत. (2) जी लस अगोदर घेतली आहे तीच लस प्रिकॉशन डोस मध्ये घ्यावयाची आहे. (3) वरील नमूद कारणांसाठी परदेशी जाणारे लाभार्थी प्रिकॉशन डोस मुदतपूर्व घेण्यास पात्र आहेत. (4) अशा लाभार्थींना दुसऱ्या डोस नंतर किमान 3 महिन्याच्या अंतराने (90 दिवस) प्रिकॉशन डोस घेता येईल. (5) जे सीव्हीसी सद्यस्थितीत प्रिकॉशन डोस देण्यासाठी पात्र आहेत त्या सर्व ठिकाणी कमी कालावधीमध्ये प्रिकॉशन डोस देता येईल. (6) प्रिकॉशन डोस घेण्यासाठी व्हिसा, ट्रॅव्हल डॉक्युमेंट इ. परदेशी जाण्याचा पुरावा असलेले कोणतेही कागदपत्र पोर्टलवर अपलोड करण्याची आवश्यकता नाही असे सूचित करण्यात येत आहे.


नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आत्तापर्यंत 18 वर्षावरील 12,54,673 नागरिकांनी कोव्हीड 19 लसीचा पहिला डोस घेतला असून 11,32,638 नागरिकांनी दोन्ही डोस घेतले आहेत. त्याचप्रमाणे 60,254 नागरिकांनी प्रिकॉशन डोस घेतला आहे.

तसेच 12 ते 14 वर्षे वयोगटातील 38,842 मुलांनी पहिला डोस आणि 27,153 मुलांनी दोन्ही डोस घेतलेले आहेत.

15 ते 18 वयोगटातील मुलांच्या लसीकरणातही नवी मुंबई महानगरपालिका आघाडीवर असून आत्तापर्यंत 80,651 मुलांनी पहिला डोस तसेच 64,016 मुलांनी दोन्ही डोस घेतलेले आहेत.

सद्यस्थितीत कोव्हीडचा प्रभाव कमी झालेला दिसत असला तरी लसीकरणामुळे कोव्हीडच्या तीव्रतेपासून होणारा बचाव लक्षात घेऊन नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी विहित वेळेत आपला प्रिकॉशन डोस घ्यावा असे आवाहन महापालिका आयुक्त श्री अभिजीत बांगर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# चोरीच्या पैशातून केलेली मौजमजा अंगलट; 14 लाखांचा ऐवज लुटणाऱ्या मामा-भाच्याला पुणे पोलिसांकडून सहा महिन्यानंतर अटक



सहा महिन्यांपूर्वी हडपसर भागातील एका घरात कोणी नसल्याची संधी साधून चोरट्यांनी साडेचौदा लाखांचा ऐवज लंपास केला होता. चोरलेल्या दागिन्यांच्या विक्रीतून चोरट्यांनी महागड्या वस्तू खरेदी करण्यास सुरूवात केली. खबऱ्याने दिलेल्या माहितीमुळे चोरीच्या गुन्हा उघडकीस आला असून या प्रकरणात वानवडी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. तसेच चोरट्यांकडून दागिने विकत घेणाऱ्या सराफालाही गजाआड करण्यात आले.

या प्रकरणी नितीन उर्फ दया विश्वास पोळ (वय ३३) आणि त्याचा भाचा साहील खंडु पेठे (वय २०, दोघे रा. तरवडे वस्ती, हडपसर) यांना अटक करण्यात आली.

दोघांकडून चोरलेले दागिने विकत घेणारा सराफ रोहित संजय पंडीत (वय ३७, रा. ससाणेनगर, हडपसर) यालाही अटक करण्यात आली. याबाबत रंगनाथ सदाशिव शिंदे (वय ५५, रा. साठेनगर, तरवडे वस्ती) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. शिंदे जागरण गोंधळाचा कार्यक्रम करतात. त्यांनी दागिने व रोकड असा १४ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज घरातील दोन स्टीलच्या डब्यांमध्ये ठेवला होता. ऐवज ठेवलेले दोन डबे त्यांनी दिवाणात लपवून ठेवले होते. १६ ऑक्टोबर २०२१ रोजी ऐवज ठेवलेले डबे चोरीला गेल्याचे उघडकीस आले होते. या प्रकरणाचा वानवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक लगड यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येत होता. आरोपी नितीन पोळ याच्याकडे भरपूर पैसे आले आहेत. त्याने मोटार तसेच दुचाकी खरेदी केल्याची माहिती तपास पथकातील पोलीस कर्मचारी सर्फराज देशमुख आणि संतोष नाईक यांना मिळाली. पोलिसांनी पोळला ताब्यात घेतले. चौकशीत पोळ आणि त्याचा भाचा साहिल पेठेने शिंदे यांच्या घरातून ऐवज ठेवलेले डबे लांबविल्याची कबुली दिली.

चोरलेल्या दागिन्यांची विक्री सराफ रोहित पंडीत याला केल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यालाही अटक करण्यात आली. पंडीत याच्याकडून सहा लाख ४० हजारांचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

आरोपी पोळ आणि पेठेकडून दुचाकी आणि मोटार जप्त करण्यात आली.

चोरीच्या पैशातून पिस्तुल खरेदी दागिने विक्रीतून मिळालेल्या पैशांमधून आरोपी पेठेने देशी बनावटीचे पिस्तुल खरेदी केले होते. एका गुंडाला जामीन मिळवून देण्यासाठी पेठेने एका मित्राला एक लाख रुपये दिल्याची माहिती तपासात मिळाली आहे.

काही महिन्यांपूर्वी पेठेला बेकायदा पिस्तुल बाळगल्या प्रकरणी अटक करण्यात आली होती. तेव्हा पोलिसांकडून करण्यात आलेल्या चौकशीत त्याने चोरीची कबुली दिली नव्हती.

पृष्ठ १ वरुन

## प्रेमाची फूस लावून अल्पवयीन

दरम्यान एकेदिवशी पीडित मुलगी टिटवाळा भागातील आपल्या घरासमोर कपडे वाळत घालत होती. त्यानंतर ती तेथून अचानक गायब झाली होती. कुटुंबीयांनी तिचा वीस दिवस शोध घेतला. ती कुठेच आढळली नाही. ती आरोपी चौधरी यांच्या शिकवणी वर्गात जात होती. चौधरी हेही त्या दिवसापासून टिटवाळयातून गायब असल्याची माहिती मुलीच्या कुटुंबीयांना मिळाली. कुटुंबीयांनी त्याच्यावर संशय व्यक्त करून टिटवाळा पोलीस ठाण्यात तक्रार केली. पण ललित यांचा मोबाईल अनेक दिवस बंद होता. त्यामुळे आरोपीचा थांगपत्ता लागत नव्हता. दरम्यान टिटवाळा पोलीस ठाण्यातील उपनिरीक्षक पंकज पाटील यांना ललित यांचा मोबाईल सुरू असल्याचे आणि तो उत्तरप्रदेशातील फरिदाबाद शहरात असल्याचे भौगोलिक ठिकाण तांत्रिक माहितीच्या आधारे मिळालं. याची माहिती मिळताच टिटवाळा पोलिसांचे एक पथक तात्काळ फरिदाबादला गेले. त्यानंतर पोलिसांनी ललितच्या मोबाइल लोकेशनच्या आधारे त्याचा शोध घेतला आणि त्याला त्याच्या निवासातून अल्पवयीन मुलीसह अटक केली. प्रेमाची फूस लावून पीडितेला आपण पळवलं होतं, अशी कुबली आरोपी शिक्षक चौधरी यानं पोलिसांना दिली.

## औरंगाबाद पुन्हा हादरलं!

उडाली असून, नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पाहायला मिळत आहे.

शहरात गुन्हेगारी वाढली... मराठवाड्याची राजधानी समजल्या जाणाऱ्या औरंगाबाद शहरात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारी वाढताना पाहायला मिळत असून, पोलिसांचा भीती उरली नसल्याची प्रतिक्रिया सर्वसामान्य नागरिकांमध्ये पाहायला मिळत आहे. तर अनेक हत्येच्या गुन्हयात आरोपी असलेले तरुण नशेखोर असल्याचे समोर आले आहेत. तर काही जण गुन्हेगारी प्रवृत्तीचे असल्याचे सुध्दा समोर आलंय.

## डोंबिवलीत सोनसाखळी चोरण्यासाठी

साईला तुला उशीर का होतोय म्हणून मोबाईलवर विचारणा केली. साईने रिक्षा चालक मला उगाच फिरवत आहे, असे सांगितले. मुलाने आपली तक्रार घरी केली, त्याच्या कुटुंबीयांकडून आपण पकडले जाऊ शकतो अशी भीती सम्राटला वाटली. रिक्षाचालक आपणास पळून नेईल या भीतीने साईने त्याला एकेठिकाणी रिक्षा थांबविण्यास सांगितली. सम्राटने वेगाने रिक्षा पळवली. साईने धावत्या रिक्षेतून उडी मारण्याचा प्रयत्न केला. त्याच्या हातमधील मोबाईल चालकाने खेचून घेण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत साईने रिक्षेतून उडी मारून घरचा रस्ता धरला. त्याने घडला प्रकार वडिलांना सांगितला. एका रिक्षा चालकाने मुलाला लुटले असल्याने वडिल मोहन यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरीनाथ भालेराव यांनी भागशाळा मैदान, मुलाला ज्या रस्त्याने नेण्यात आले. त्या रस्त्यावरील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. चित्रीकरणात सिध्दार्थनगरमधील सराईत गुन्हेगार अजय मगरे याने हा प्रकार केल्याचा संशय पोलिसांना आला. पोलिसांनी अजयचे घर गाठले. कुटुंबीयांनी अजयचा लहान भाऊ सम्राट रिक्षा चालवितो असे सांगितले. सम्राटला पोलिसांनी सापळा लाऊन अटक केली. त्याने साईला लुटल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून १५ ग्रॅम वजनाची सोनसाखळी आणि त्याची सव्वा लाख किमतीची रिक्षा जप्त केली. सम्राटने आणखी असे प्रकार केले आहेत का याचा तपास पोलीस करत आहेत.

## सोलापूर शहरात पुन्हा चेन स्नॅचिंग

अचानक त्यांच्या दुचाकीजवळ त्याची गाडी नेली आणि प्रिती भावी यांच्या गळयातील सोन्याचे गंठण ओढले. ३० हजार रुपयांचे गंठण चोरट्याने १८ एप्रिल रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास चोरून नेल्याचेही त्यांनी पोलिसांना सांगितले. पोलिस उपनिरीक्षक मुरकुटे तपास करीत आहेत. महिलांमध्ये भीतीचे वातावरण दुचाकीवरून घराकडे किंवा नातलगांकडे जाणाऱ्या महिलांच्या गळयातील दागिन्यांवर वॉच ठेवून अनोळखी दुचाकीस्वार चेन स्नॅचिंग करीत आहेत. त्यामध्ये दुचाकीवरून जाणारी महिला रस्त्यावर पडेल, तिच्या जीवाचे बरे वाईट होईल, याचा चोरटे काहीच विचार करीत नाहीत. तीन दिवसांत दोन घटना घडल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शहरातील बंद घरांमध्ये चोरी होते, सकाळी घर उघडे असलेल्या घरातील लॅपटॉप, मोबाइल चोरी होत आहेत.

## तबेल्यात घुसून सपासप वार

या प्रकरणी आरोपीला न्यायालयात हजार केले असता 24 मे पर्यंत पोलिस कोठडी सुनवण्यात आली आहे. दोन माणसांच्या आर्थिक व्यवहारांचा फटका मुक्या जीवांना बसला. भांडणामुळं मुक्या जनावरांना बळी पडावं लागल्याची घटना समजताच परिसरात खळबळ उडाली होती. 15 मे रोजी भिवंडी शहरातील बंदर मोहल्ला येथील अरहम मोमिन यांच्या तबेल्यात ही घटना घडली होती. तब्बल 22 म्हशी आणि रेड्यांवर सुऱ्याने सपासप वार करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली होती. त्यापैकी 7 म्हशींचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. तबेला मालकाचं लाखो रुपयांचं नुकसान झालं होतं. याबाबत अरहम मोमीन यांच्या तक्रारीवरुन निजामपूरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी तपास करत आरोपीला बेड्या ठोकल्या.

## आरोग्यमंत्र्यांचे कोरोनाच्या

यांच्याशी चर्चा करणार आहेत. ग्रामीण भागात जाऊन काम केले पाहिजे असे पक्षश्रेष्ठींचे आदेश आहेत. पक्ष संघटन वाढीसाठी काम केले जात आहे. आज काटोलमध्ये जाऊन ग्रामीण भागातील आरोग्य केंद्र विषय काम पूर्ण झाले. जिल्हा रुग्णालयाची इमारत झाली आहे. विदर्भाचे मुख्यालय म्हणून ते कसे लवकर कार्यान्वित होईल, यासाठी पाऊले उचलणार आहेत. तसेच डागा आणि मेटल हॉस्पिटलला भेट देणार असल्याचेही राजेश टोपे म्हणाले.काटोल मतदार संघात जास्त मेहेरबान आहे का? यावर बोलताना राजेश टोपे म्हणाले की, काटोल मतदार संघात विकास झाला पाहिजे. अनिल देशमुख हे वरिष्ठ मंत्री राहिले आहे. सलीलला जितकी जास्त मदत करता येईल, तितकी मदत करण्याचे काम सुरू आहे. अनिल देशमुख नसल्याने मतदार संघात विकासाला खीळ बसू नये, यासाठी महाविकास आघाडी प्रयत्न करत आहे, असेही टोपे म्हणाले.संभाजी राजेबद्दल पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील - आम्ही सर्वच शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराचे आहेत. छत्रपती संभाजी राजे यांच्याबाबत आदर आहे. त्यांना लोकसभेची उमेदवारी दिली होती. त्यांचे पवार साहेब यांच्याशी घनिष्ठ संबंध आहेत. यांच्याबाबत महाविकास आघाडीचे पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील.सेनेचे आमदाराचा निधी वाटपात दुजाभाव होत असल्याचा आरोप - निधी वाटपात दुजाभाव केल्याचा आरोप अमादर आशिष जयस्वाल यांनी राष्ट्रवादीवर आरोप केला आहे. आशिष जयस्वाल हे ज्येष्ठ आमदार आहेच. ते माझे मित्र आहेत, त्यांच्या मतदार संघात विकास झाला पाहिजे, ही महाविकास आघाडीची जवाबदारी आहे. त्यासाठी आम्ही प्रयत्न करू असेही टोपे म्हणाले.

# तरुणीच्या हत्येनंतर आणखी एक खुनाचा गुन्हा दाखल; 24 तासात तीन खून



औरंगाबाद शहर खुनाच्या घटनांनी हादरले आहे. गेल्या 24 तासात शहरात तीन खुनाच्या घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. शहरातील रेल्वे स्टेशन भागात भरदिवसा कॉलेजजवळ तरुणीची भोसकून हत्या झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. एकतर्फी प्रेमातून ही हत्या करण्यात आल्याचा अंदाज वर्तवला जात असून घटनास्थळी पोलीस दाखल झाले आहे. ग्रंथी सुखप्रीत कौर प्रितपालसिंग ( वय 22 वर्षे ) असे मृत हत्या झालेल्या तरुणीचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, बीबीएच्या प्रथम वर्गात शिकत असलेल्या ग्रंथीचा आज देवगिरी महाविद्यालयाच्या पाठीमागील भागात मृतदेह आढळून आला आहे. तर या तरुणीच्या अंगावर जखमा पाहायला मिळून आले आहेत. धारदार शस्त्राने तिची हत्या करण्यात आल्याचे बोलले जात आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एकतर्फी प्रेमातून हा खून करण्यात आल्याचा अंदाज आहे.

घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकारी दाखल झाले असून आरोपीच्या शोधात पथक तैनात करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वी शहरातील नारेगाव भागात एका तरुणीचा खून झाल्याची घटना ताजी असतानाच आज पुन्हा एका तरुणीचा खून झाल्याने शहर हादरले आहे.

पोलीस आरोपीच्या शोधात...

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हत्या झालेली मुलगी आणि आरोपी दोन्ही एकाच समाजातील असून दोन्ही एकमेकांना चांगले ओळखत होते. खुनाची घटना समोर येताच पोलिसांचे चार पथक आरोपीच्या शोधात रवाना करण्यात आले आहे. तर मुलीचा मृत्तदेह उत्तर तपासणीसाठी घाटी रुग्णालयात पाठवण्यात अली आहे.

तरुणीच्या हत्येनंतर आणखी एक खुनाचा गुन्हा दाखल; 24 तासात तीन खून

मराठवाड्याची राजधानी समजल्या जाणाऱ्या औरंगाबाद शहराची ओळख आता 'क्राईम कॅपिटल' होण्याच्या मार्गावर दिसत आहे. कारण गेल्या 24 तासात शहरात तीन खुनाचे गुन्हे दाखल झाले आहेत.

धक्कादायक म्हणजे एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीची एकतर्फी प्रेमातून चाकू भोसकून भर दिवसा हत्या करण्यात अली आहे. तर आणखी दोन वेगवगेळया घटनेत सुध्दा खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून यामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. त्यामुळे औरंगाबाद शहर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न चिन्ह उपस्थित केला जात असून पोलिसांचा धाक उरला नसल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये पाहायला मिळत आहे. पहली घटना शहरातील कटकटी गेट भागात पाहायला मिळाली.

शुल्लक कारणावरून दोन तरुणांमध्ये वाद झाला आणि त्यांनतर 19 वर्षाच्या फरहान खान निजाम खान नावाच्या तरुणाने साबिर शहा कासीम शहा ( वय 36, वर्षे रा. नेहरूनगर ) नावाच्या व्यक्तीला धारदार हत्याराने भोसकले. तर त्यांनतर जवाहरनगर पोलीस ठाणे हद्दीतील दोन मित्रांमध्ये झालेल्या वादानंतर बियरच्या फुटलेल्या बाटलीच्या काचने गळा चिरून हत्या केली आहे. शेख नासिर शेख बशीर वय ( 38 ) असे मृत व्यक्तीचे नाव असून फय्याज राजू पठाण असे आरोपीचे नाव आहे.

# अकोल्यात अल्पवयीन विद्यार्थिनींसोबत अश्लील चाळे, कोचिंग क्लासेसच्या संचालकाविरुद्ध पॉस्कोचा गुन्हा




अकोला शहरातील चौधरी कोचिंग क्लासचे संचालक वसीम चौधरी याच्याविरुद्ध रविवारी अल्पवयीन विद्यार्थिनीसोबत अश्लील चाळे केल्याप्रकरणी सिव्हील लाईन पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला. कलम 354 सह पोस्को व आयटी ॲक्टनुसार गुन्हा नोंदवून सिव्हिल लाईन्स पोलिसांनी वसीम चौधरी याला अटक केली आहे.

अकोला येथील चौधरी कोचिंग क्लासचे संचालक वसिम चौधरी याच्याविरुद्ध रविवारी सायंकाळी सिव्हिल लाईन्स पोलिस स्टेशनमध्ये एका अल्पवयीन विद्यार्थिनीने तक्रार दाखल केली

. या तक्रारीनुसार वसीम चौधरी याने मुलीसोबत मोबाईलवरून अश्लिल चॅटिंग केल्याचा आरोप आहे. त्यानंतर तिला अभ्यासाच्या बहाण्याने घरी बोलावून तिच्यासोबत अश्लिल चाळे केल्याचेही तक्रारीत नमुद आहे.

घाबरलेल्या मुलीने ही बाब पालकांना सांगितली. त्यानंतर पालकांसोबत थेट सिव्हिल लाईन्स पोलिस स्टेशन गाठून वसीम चौधरी विरुद्ध पोलिस तक्रार दाखल केली. पोलिसांनी विद्यार्थिनीच्या तक्रारीवरून विनयभंग करणे, पोस्को कलम नऊ एफ, 10 अल्पवयीन मुलीसोबत अश्लील चाळे करणे आणि आयटी ॲक्ट कलम सहा, सात (ब) मोबाईलवर अश्लील चॅटिंग करने आदी गुन्हे दाखल केले आहे. सिव्हील लाईन पोलिसांनी वसीम चौधरीला अटक केली आहे.

नेमकं काय घडलं :

20 मे रोजी वसिम चौधरी याने पीडित अल्पवयीन मुलीच्या मोबाईलवर मेसेज पाठवून महत्वाचं बोलायचं आहे. असे म्हणून तिला क्लासला बोलाविले, त्यानंतर ती वसिम चौधरी यांच्या कोचिंग क्लासला दुपारी 5 वाजता घरून निघाली. अन् क्लासला गेल्यावर चौधरींनी तिला घरात बोलाविले आणि मागील रुममध्ये बसविले. आणि तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. यावेळी अल्पवयीन मुलीने त्याला धक्का देवून बाहेर पळ काढला. अन् विरोध करत आरडाओरड केली.

आईच्या जागरुकतेनं प्रकार आला उघडकीस :

वसिम चौधरी हा त्याच्या फोनवरून चॅटिंग करुन, तिला अश्लील ईमोजी पाठवायचा. चौधरीच्या अशा वागण्यामुळे ती खूप तणावात होती. यासोबतच वसिम चौधरीने तिला धमकीही दिली होती की, तू हे जर कोणाला सांगितले तर मी तुझे करिअर बरबाद करेल. त्यामुळे भीतीपोटी घडलेला प्रकार तिने कोणाला सांगितला नाही. कोचिंग क्लासेसला जाणे बंद केले. अन् घरीच ऑनलाईन क्लासेस सुरु केले. आज आईने तिला म्हटले की, ऑफलाईन क्लासेस चालू असतांना तू ऑनलाईन क्लासेस का करतेस, असे म्हणून ट्यूशन क्लासला जाण्यासाठी आग्रह केला. त्यानंतर या पीडित मुलीने सर्व घडलेला प्रकार तिच्या आईला सांगितला. अशा प्रकारे झालेल्या घटनेची तक्रार तिने सिव्हिल लाईन पोलीस स्टेशनला दिली आहे. या तक्रारीनंतर चौधरी याच्यावर ३५४(अ)(ड), ५०६, १०, १२ पॉस्कोअंतर्गत गुन्हे दाखल दाखल झाले असून अटक करण्यात आली आहे. आरोपीवर कठोर कारवाईची सर्वपक्षीय मागणी :

या घटनेची माहिती मिळताच शिवसेनेचे आमदार नितीन देशमुख आणि माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया यांच्यासह अनेक पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येनं सिव्हील लाईन पोलीस स्टेशनमध्ये गर्दी केली होती. अतिप्रसंगाचा प्रयत्न करणाऱ्या वसिम चौधरीवर कठोर कारवाईची मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान, पोलिसांनी तोष्णीवाल लेआऊटमधील चौधरीच्या कोचिंग क्लासला सील करीत तेथे मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

# झेरॉक्स मशीनचा वापर करत बनवल्या हुबेहूब नकली नोटा, तरुणाने दिलेले प्रात्यक्षिक पाहून पोलिसही चक्रावले!



झेरॉक्स मशीनचा वापर करीत अगदी हुबेहूब वाटणाऱ्या बनावट नोटा तयार करून वितरित करण्याच्या प्रयत्नात असलेल्या तरुणास पोलिसांनी अटक केली आहे, तसेच त्याच्या कडून काही नकली नोटाही जप्त करण्यात आल्या आहेत. जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यात हा प्रकार समोर आला आहे. घडलेला प्रकार पाहून पोलिसही चक्रावले असून जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

पोलिसी खाक्या दाखवताच सांगितली हकीकत

जळगाव जिल्ह्यातील जामनेर पोलिस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या पहूर बस स्थानक परिसरात पोलिस गस्त घालीत असताना एक संशयास्पद तरुण या ठिकाणी आढळून आला होता. या तरुणाला पोलिस कर्मचाऱ्यांनी हटकले असता तो उडवा उडवीची उत्तर देत असल्याचं लक्षात आल्यावर पोलिसांनी त्याची झडती घेतली, यावेळी त्याच्या खिशात दोनशे रुपयांच्या काही बनावट नोटा आढळून आल्या. पोलिसांनी त्याला पोलिस ठाण्यात नेऊन पोलिसी खाक्या दाखवताच त्याने प्रिंटरच्या साहायाने नकली नोटा तयार करून त्या वितरित करीत असल्याचा खुलासा पोलिसांकडे केला.

नकली नोटा छापणारे प्रिंटर सापडले

उमेश राजपूत नावाच्या या तरुणाने ही माहिती दिली असून पोलिसांनी त्याच्या हिंगणे गावी जाऊन घराची झडती घेतली असता त्या ठिकाणी नकली नोटा छापण्यासाठी लागणारे प्रिंटर आणि दोनशेच्या अनेक नकली नोटा आढळून आल्या. यावेळी पोलिसांनी उमेश राजपूतसह नोटा बनवण्यासाठी लागणारे साहित्यही जप्त केले. नकली नोटा बनविल्या प्रकरणी उमेश राजपूत याच्या विरोधात पहुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तरुणाने दाखविले नोटा बनविण्याचे प्रात्यक्षिक

या घटनेत पोलिसांनी उमेश राजपूत या तरूणाला अटक केली असून त्याच्या या कृत्यामध्ये आणखी कोण सहभागी आहेत याचा तपास आता पोलिस करीत आहेत. आरोपी उमेश राजपूत याच्याकडून नकली नोटा बनविण्याची माहिती घेत असताना त्याने झेरॉक्स मशीनचा वापर करून दोनशे आणि पाचशे रुपयांच्या नोटा बनविण्याचे प्रात्यक्षिकच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना करून दाखवल्याने उपस्थित अधिकारी आणि कर्मचारीही चांगलेच विचारात पडले असल्याचं पाहायला मिळाले.

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार २४ ते ३० मे - २०२२


संपादकीय...



## पोलिसी हीरोगिरीला दणका

हैदराबादेत २०१९ मध्ये एका महिला पशुवैद्यकीय डॉक्टरवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या चार आरोपींना गोळ्या घालून ठार करणाऱ्या पोलिसांनी त्यासाठी जे स्पष्टीकरण दिले होते, ते खोटे आहे, असा निष्कर्ष सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या आयोगाने काढला आहे. कायदा हातात घेऊन केल्या जाणाऱ्या अशा प्रकारच्या पोलिसी कारवायांना त्यातून आळा बसावा, अशी अपेक्षा आहे. या घटनेतील पीडिता ज्या भयानक अशा अत्याचाराची बळी ठरली, तिला, तिच्या कुटुंबीयांना न्याय मिळायला हवा आणि आरोपींना कडक शिक्षा व्हायला हवी, याविषयी कोणाचेही दुमत होणार नाही. परंतु संपूर्ण तपास, पुरावे उभे करणे आणि त्या आधारे न्यायालयात ते सिद्ध होणे या प्रक्रियेलाच फाटा देऊन रस्त्यावर 'न्याय' करता येणार नाही. तसे करणे म्हणजे 'कायद्याचे राज्य' या संकल्पनेलाच हरताळ फासण्यासारखे आहे, हे आयोगाच्या निष्कर्षांमुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. सर्व संबंधित यंत्रणांना त्यातून योग्य तो संदेश मिळाला असेल.

पोलिसांनी अशा प्रकारे कायदा हातात घेऊन गुन्हेगारांना ठार मारण्याच्या घटना आपल्या देशात नव्या नाहीत. १९८० या दशकाच्या प्रारंभी मुंबईत अशाच प्रकाराने पोलिसांनी कायदा धुडकावून लावत मन्या सुर्वे नावाच्या कुख्यात गुंडाला भररस्त्यात गोळ्या घातल्याचे प्रकरण गाजले होते. मात्र, आता हैदराबादेत पोलिसांनी दाखवलेल्या या 'सिंघमगिरी'नंतर थेट सर्वोच्च न्यायालयानेच न्या. व्ही. एस.शिरपूरकर यांच्या नेतृत्वाखाली नियुक्त केलेल्या आयोगाने काढलेला हा निष्कर्ष महत्त्वपूर्ण आहे. ही चकमक बनावट होती आणि आरोपींना ठार करणे, हाच त्यावेळी झालेल्या पोलिसी गोळीबाराचा हेतू होता, एवढेच सांगून न्या. शिरपूरकर आयोग थांबलेला नाही, तर दहा पोलिसांवर खुनाच्या आरोपाखाली खटला दाखल करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही या अहवालाची गांभीर्याने दखल घेतली असून, पुढील कारवाईसाठी हा खटला तेलंगण उच्च न्यायालयाकडे पाठवला आहे. पोलिसी अतिरेक आणि न्यायप्रक्रियेत होत असणारा कमालीचा विलंब आता ऐरणीवर आल्या आहेत. महिला डॉक्टरवर झालेला अमानुष बलात्कार आणि त्यानंतर झालेली तिची निर्घृण हत्या यानंतर तेलंगण पोलिसांनी तातडीने चार आरोपींना अटक करण्यात यश मिळवले होते. तेव्हा स्थानिक जनता पोलिसांवर खुश होती. त्यातून मिळणाऱ्या झटपट लोकप्रियतेमुळे बहुधा संबंधित पोलिस वाहावत गेले.

या आरोपींना घटनास्थळी नेऊन, ती घटना कशी घडली, ते पुन्हा त्यांच्याकडून करवून घेण्याचे या पोलिसांनी ठरविले होते, ही पोलिसी तपासातील एक नित्याची बाब. मात्र, तेथे जे काय घडले ते पोलिसी अत्याचाराचे आणि कायद्याचे रक्षण करणाऱ्या यंत्रणांच्या अतिरेकावर झगझगीत प्रकाश टाकणारे होते. तेथे झालेल्या गोळीबारात हे आरोपी ठार झाल्यानंतर, घटनास्थळी पुरावे गोळा करत असताना आरोपींनी पोलिसांचे पिस्तूल हिसकावून घेत, पोबारा करण्याचा प्रयत्न केल्यामुळे गोळीबार करणे भाग पडले, हा पोलिसी दावा अविश्वसनीय असल्याचे या आयोगाने स्पष्ट केले आहे. या दाव्यामागे कोणताही सबळ पुरावा आढळला नाही. 'चकमकी'त हे आरोपी ठार होताच, हैदराबादेत लोकांनी उत्स्फूर्तपणे 'आनंदोत्सव' साजरा करत, पीडितेला न्याय मिळाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली होती. त्यामागचे एक कारण न्यायप्रक्रियेत होणारा विलंब हे आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. बलात्काराच्या अनेक गुन्ह्यातील आरोपी तांत्रिक कारणांमुळे निर्दोष सुटल्याची उदाहरणेही आहेत. त्या सगळ्याविषयीची खदखद त्या



जल्लोषातून व्यक्त होत होती, हे नाकारता येणार नाही. पोलिस अशा प्रकारे कायदा हातात कसा घेऊ शकतात, असा तार्किक विचार त्या क्षणी करण्याचे भान जनतेला राहिले नाही. पण पोलिसांना हे भान हवेच. देशातील कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांनी कायदापालनाची जबाबदारी पार पाडायलाच हवी. त्या जर न्यायसंस्थेचे अधिकार स्वतःकडे घेऊ लागल्या, तर अनर्थ ओढवेल. न्या. शिरपूरकर आयोगाच्या या अहवालामुळे या घटनेमागील जुन्या जखमा पुन्हा भळभळून वाहू लागल्या आहेत. या तथाकथित पोलिसी 'चकमकी'त ठार झालेल्या आरोपींच्या नातलगांनी 'अखेर सत्य काय ते बाहेर आलेच,' अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. मात्र, त्याचवेळी पीडित महिलेचे कुटुंबीय मात्र या पोलिसांच्या बाजूने उभे राहिले आहेत. 'आम्हाला आयोगाचे म्हणणे ठाऊक असले तरीही आम्ही आम्हाला न्याय देणाऱ्या या पोलिसांच्याच पाठीशी आहोत,' असे त्यांनी सांगितले आहे. तर या 'चकमकी'नंतर आनंद व्यक्त करणाऱ्या मंत्रीमहोदयांपासून ते युवक संघटनांपर्यंत सर्वांनीच या अहवालानंतर मौन पाळणेच पसंत केले आहे. एकूण परिस्थिती पाहता आपल्या न्यायप्रक्रियेला गती कशी प्राप्त होईल आणि वर्षानुवर्षे खटले कोर्टाच्या चावडीवर पडून राहणार नाहीत, याची काळजी घ्यायला लागेल. त्यासाठी न्यायप्रक्रियेतील सुधारणा तातडीने अमलात आणण्याची नितांत गरज आहे. दीर्घकाळ ज्यांची चर्चाच जास्त होत आहे, त्या पोलिस सुधारणाही घडविणे आवश्यक आहे.

# अंतारंभ?

राज्यांवर '२५ गुणां'चे बंधन घालून केंद्राला नकाराधिकार देणारी वस्तू/सेवा कर परिषदेची सध्याची रचना, सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयामुळे बदलू शकेल..





वस्तू व सेवा करासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. ''वस्तू/सेवा कर परिषदेत केल्या जाणाऱ्या शिफारशी राज्ये आणि केंद्र सरकार यांना बंधनकारक नाहीत. केंद्र आणि राज्ये यांना आपापली कर आकारणी करण्याचा अधिकार आहे,'' इतका निःसंदिग्ध निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला. 'लोकसत्ता'ने या कराच्या मुद्द्यावर अनेकदा मांडलेली भूमिका किती रास्त होती हे सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने अधोरेखित होते हेच केवळ या निर्णयासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या अभिनंदनामागील कारण नाही. या निर्णयाने वस्तू/सेवा कर आकारणी व्यवस्थेचा आतापर्यंत उभा राहिलेला इमला पूर्णपणे बदलणार असून या रचनेकडे पूर्णपणे नव्याने पाहावे लागणार आहे. याची गरज होती. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयामुळे ती प्रक्रिया सुरू होते; म्हणून याचे स्वागत. तसेच आपल्या देशातील घटनादत्त संघराज्य व्यवस्था जपण्याच्या गरजेची जाणीव या निर्णयामुळे पुन्हा एकदा जागृत होईल म्हणूनही या निर्णयाचे स्वागत.

ते केल्यानंतर झाले काय आणि त्यामुळे होईल काय, यावर विवेचन. गुजरात उच्च न्यायालयाने सागरी मार्गाने आयात होणाऱ्या उत्पादनांवर एकात्मिक वस्तू/सेवा कर आकारण्याचा निर्णय २०१७ साली रद्दबातल केला. केंद्राच्या या एकात्मिक दाव्यामुळे राज्य सरकारांच्या वस्तू/सेवा कर आकारणी अधिकाराचा संकोच होतो. गुजरात उच्च न्यायालयाने तो प्रयत्न हाणून पाडला. त्यास केंद्राने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी या विषयावरील अंतिम निकालात केंद्राच्या आव्हान अर्जास केराची टोपली दाखवली. घडले ते इतकेच. पण तसे घडत असताना न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या न्यायपीठाने वस्तू/कर परिषदेविषयी जे भाष्य केले त्यामुळे हा निर्णय कमालीचा दूरगामी ठरतो. तो कसा हे समजून घेण्याआधी या कराच्या रचनेविषयी. आपल्याकडे १ जुलै २०१७ पासून या कराचा अंमल सुरू झाला. त्यासाठी वस्तू/सेवा कर परिषदेची स्थापना केली गेली. अर्थमंत्री या परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात आणि सर्व राज्यांचे अर्थमंत्री सदस्य असलेल्या या परिषदेतील सर्व निर्णय एकमताने घेतले जातात. हे कर आकारणीबाबतचे निर्णय, म्हणजे कोणत्या वस्तूवर किती कर आकारावा आदी, नंतर सर्व देशभर अमलात येतात. परंतु त्याबाबत तीव्र मतभेद आहेत. विशेषतः भाजपेतर राज्यांनी या कर परिषदेतील प्रक्रियेविषयी सातत्याने आक्षेप घेतले असून सत्ताधाऱ्यांनी त्यांची बोळवण 'राजकीय विरोध' अशी करून त्याकडे दुर्लक्ष केले. 'या परिषदेत सर्व राज्यांचे प्रतिनिधी असतात. तेथे एकमताने घेतल्या जाणाऱ्या निर्णयांवर नंतर आक्षेप का?' असा युक्तिवाद सत्ताधाऱ्यांकडून सतत केला जातो. तो फसवा आहे. पण अर्थसाक्षरता बेतासबात असलेल्या प्रदेशात हे सत्य लक्षातही येत नाही. सुदैवाने सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाने हे फसवेपण लक्षात येईल.

ते असे की या परिषदेत कोणताही मुद्दा/ प्रस्ताव/ सूचना नाकारण्याचा अधिकार फक्त आणि फक्त केंद्र सरकारलाच आहे. राज्ये केवळ प्रस्ताव मांडू शकतात. पण त्यासाठीही त्यांना किमान २५ गुणांची आवश्यकता असते. प्रत्येक राज्यास साधारण अडीच गुण अशी वाटणी लक्षात घेतल्यास प्रस्तावासाठीही किमान १० राज्यांनी एकत्र यायला हवे. ती केवळ भाजपेतर पक्षांचीच असू शकतात. भाजप राज्यांची काय बिशाद ती केंद्रास काही सुचवतील! आणि ही समजा दहा राज्ये एकत्र येऊन प्रस्ताव सादर झाला तरी केंद्र सरकारचा वर नकाराधिकार आहेच! याचा साधा अर्थ असा की केंद्राने वाटेल ते करावे आणि राज्यांनी केवळ नंदीबैलाप्रमाणे गुमान माना डोलवाव्यात अशी ही वस्तू/ सेवा कर परिषदेची रचना. बरे ही परिषद व्यापक देशहितार्थ वागत असती तर या रचनेकडेही दुर्लक्ष करता आले असते. पण वास्तव तसे नाही. म्हणून गुजरात निवडणुकांच्या तोंडावर खाकऱ्यावरील करात कपातीचा निर्णय ही परिषद घेते आणि पंजाबातील पराभवानंतर गुरुद्वारांच्या लंगरासाठीची धान्यखरेदी या करातून वगळली जाते. या अशा रचनेमुळे राज्य सरकारांचा कर अधिकारच जणू रद्दबातल झाला. 'लोकसत्ता'ने विविध संपादकीयांद्वारे हे सत्य अनेकदा दाखवून दिले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निर्णयाने हे वास्तव बदलू शकेल. ''राज्य सरकारे आणि केंद्र सरकार या दोघांनाही कर आकारणीचा अधिकार आहे आणि तो समान आहे'' अशा अर्थाचे विधान या निकालपत्रात आहे. याचा अर्थ असा की केंद्र सरकार हे कोणी पालक आहे आणि राज्य सरकारे म्हणजे अज्ञ बालक अशी जी काही मांडणी गेली सात वर्षे सुरू आहे ती या निकालाने मोडून पडते. वास्तविक घटनेनुसार संसद आणि राज्यांच्या विधानसभा यांना कर आकारणीबाबत समान अधिकार दिले असून वस्तू/सेवा कराच्या विद्यमान रचनेत त्यात राज्यांच्या अधिकारांची केंद्राकडून पूर्णपणे पायमल्ली होते. 'वस्तू/सेवा कर कायदा मंजूर झाल्याने केंद्रास मिळालेले अधिकार हे फक्त 'मतपरिवर्तन' करण्यासाठीच आहेत' (पर्स्युएसिव्ह पॉवर्स) असे सर्वोच्च न्यायालय स्पष्ट करते. याचाच दुसरा अर्थ असा की केंद्र सरकारला या कायद्याने आपली मते राज्यांवर लादण्याचा अधिकार दिलेला नाही. ''या कायद्यान्वये अस्तित्वात आलेल्या वस्तू/सेवा कर परिषदेतील निर्णय या केवळ शिफारशी आहेत. राज्य सरकार आणि केंद्रदेखील त्या नाकारू शकते'' इतक्या स्पष्टपणे अर्थमंत्र्यांच्या आधिपत्याखालील या परिषदेस आपली जागा सर्वोच्च न्यायालय दाखवून देते. ''या परिषदेतील निर्णय हे केवळ परस्पर सहयोगाच्या चर्चेचे (कोलॅबरेटिव्ह डिस्कशन) फलित आहेत'' हे न्यायालयाचे मत यापुढे केंद्रास विचारात घ्यावे लागेल. या परिषदेच्या निर्णयास राजकीय आव्हान मिळू शकते याची दखल घेतानाच सर्वोच्च न्यायालय 'या निर्णयांचा परिणाम संघराज्य व्यवस्थेवर होतो' हेदेखील नमूद करते, ही अत्यंत स्वागतार्ह बाब.

एका बाजूने राज्यांचे कर आकारण्याचे अधिकार काढून घ्यायचे आणि दुसरीकडून या करामुळे राज्यांच्या झालेल्या नुकसानभरपाईची मुदत वाढवून द्यायची नाही, अशी दुहेरी गळचेपी सध्या राज्यांना सहन करावी लागते. यावर भाजप-शासित राज्यांकडून आवाज उठवण्याची हिंमत दाखवली जाईल अशी आशा बाळगणेदेखील वेडगळपणाचे ठरेल. ममता बॅनर्जी यांचे पश्चिम बंगालातील तृणमूल सरकार वा राज्यातील महाविकास आघाडी यांनी याविरोधात आवाज उठवला. पण आक्रस्ताळेपणामुळे ममताबाईंकडे आणि आक्रमकतेच्या अभावामुळे महाराष्ट्राकडे दुर्लक्ष झाले. तथापि वस्तू/सेवा कराच्या संघराज्यविरोधी भूमिकेवर सातत्याने अभ्यासपूर्ण भूमिका मांडली तमिळनाडूच्या द्रमुक सरकारातील अर्थमंत्री पलानिवेल त्यागराजन यांनी. स्वतः अत्यंत उच्चविद्याविभूषित असलेल्या त्यागराजन यांनी वेळोवेळी या कायद्याची अक्षरशः पिसे काढली आणि तो संघराज्य व्यवस्थेच्या कसा मुळावर येतो हे दाखवून दिले. हे झाले राजकारण. कायद्याच्या मुद्द्यावरही सर्वोच्च न्यायालयाचा गुरुवारचा निकाल हीच बाजू उचलून धरतो आणि संघराज्याच्या काही घटकांस अधिक अधिकार आहेत हे गृहीतकच अयोग्य ठरवतो. या निर्णयामुळे बरीच मोठी उलथा-पालथ होईल, हे उघड आहे. त्यास इलाज नाही. यामुळे अस्थिरता येईल हेही खरे असले तरी त्यालाही इलाज नाही. अस्थिरतेचा बागुलबुवा दाखवून आहे ते स्वीकारा म्हणणे म्हणजे काही कुटुंबे बेघर होण्याची भीती दाखवून अनधिकृत बांधकाम गोड मानून घ्या म्हणण्यासारखे. कायद्यातील वाईट दूर व्हायलाच हवे. वस्तू/सेवा कर कायद्याबाबतचा निर्णय ही त्याची सुरुवात! म्हणून हा एकाअर्थी या कायद्याचा अंतारंभ ठरू शकतो.

## मनोरुग्ण तरुणाची गळा आवळून हत्या, वर्ध्यातील आर्वी येथील घटनेने खळबळ

**तांत्रिक विद्येचा वापर करून 22 वर्षीय मनोरुग्ण तरुणाची गळा आवळून हत्या करण्यात आली आहे. वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यात ही घटना घडली आहे.**

उपचाराच्या नावाखाली तांत्रिक विद्येचा वापर करून 22 वर्षीय मनोरुग्ण तरुणाची गळा आवळून हत्या करण्यात आली आहे. वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यात ही घटना घडली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून तीन संशयित आरोपींना अटक करण्यात आली आहे. अब्दुल रहीम अब्दुल मजीद (वय, 60), अब्दुल जूनैद अब्दुल रहीम ( वय 22) आणि अब्दुल जमीर अब्दुल रहीम ( वय, 20 सर्व रा. विठ्ठल वार्ड, आर्वी ) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. गणेश तुकारामजी सोनकुसरे (वय 49 ) हे अमरावती जिल्ह्यातील बेलपुरा येथील रहिवाशी आहेत. त्यांचा मोठा मुलगा मानसिक रूग्ण आहे. संशयित आरोपींनी तुमच्या मुलाला आम्ही नीट करतो असे





सांगितल्यामुळे सोनकुसरे यांनी उपचार करण्यासाठी त्यांच्या मुलाला आर्वी येथील संशयित आरोपींकडे घेऊन गेले होते. परंतु, तिन्ही आरोपींनी त्यांच्या राहत्या घरी संगनमत करून मनोरुग्ण असलेल्या तरुणावर तांत्रिक विद्येचा वापर करून उपचार केले आणि त्याचा गळा आवळून ठार केले. त्यांनतर पोलिसांना कोणतीही माहिती न देता मृतदेह परस्पर कुटुंबियांच्या स्वाधीन करत पुरावा नष्ट केला. याप्रकरणी मृत तरूणाचे वडील गणेश सोनकुसरे यांनी अमरावती येथील सिटी कोतवाली पोलिसांत तोंडी तक्रार दिली. सिटी पोलिसांनी प्राथमिक माहितीच्या आधारे गुन्हा दाखल करून याबाबत आर्वी पोलिसांना माहिती दिली. त्यानुसार आर्वी येथे संशयितांविरोधात दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक प्रशांत होळकर, अप्पर पोलीस अधीक्षक यशवंत सोलंकी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील साळुंखे, ठाणेदार भानुदास पिदूरकर, फौजदार हर्षल नगरकर यांनी घटनास्थळी भेट दिली आणि घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन संशयितांना अटक केली. दरम्यान, संशयितांनी या पूर्वी असे काही गुन्हे केले आहेत का? यासह मनोरूग्ण तरूणाची कोणत्या कारणावरून हत्या केली याचा हर्षल नगरकर अधिक तपास करत आहेत.

## प्रेयसीचे महागडे हट्ट पुरवण्यासाठी प्रियकर बनला अट्टल चोर, 12 दुचाकी चोरल्या

**प्रेयसीचे महागडे हट्ट पुरवण्यासाठी प्रियकर अट्टल चोर बनला. नागपुरात त्याने 12 दुचाकी चोरल्या. प्रेयसी आपल्याला सोडवायला येईल, असा त्याचा समज कायम आहे.**

नागपूर : नागपूरच्या सीताबर्डी पोलिसांनी एका प्रेमवीर चोराला अटक केली आहे. ऋषभ उर्फ लालू असोपा असे त्याचे नाव आहे. 28 वर्षांच्या ऋषभ असोपाने नागपुरातील विविध भागातून मोठ्या संख्येने दुचाकी चोरल्या आहे. पोलिसांनी आतापर्यंत त्याच्याकडून 12 दुचाकी जप्तही केल्या आहेत.

विशेष म्हणजे दुचाकी चोरण्यात पटाईत असलेल्या ऋषभ उर्फ लालू हा प्रेयसीचे महागडे हट्ट पुरवण्यासाठी चोऱ्या करायचा. नवनवीन युक्त्या लढवत गाड्या चोरी करण्यात त्याचा हातखंडा आहे. नागपूर शहरात दुचाकी चोरीच्या घटना वाढत असल्याने शहरातील अनेक पोलीस ठाण्याचे कर्मचारी चोरांच्या मागावर होते. खबऱ्यांमार्फत ऋषभ नावाचा जुना चोर नवनव्या दुचाकीवर फिरताना दिसत असल्याची आणि अलीकडे त्याच्याकडे भरपूर पैसा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर ऋषभच्या लोकेशनची माहिती समजताच पोलिसांनी त्याला अटक केली. पोलिसांनी त्याच्याकडून तब्बल 12 दुचाक्या जप्त केल्या आहे.

### प्रेयसी आणि स्वतःचे महागडे शौक पूर्ण करण्यासाठी बाईक चोरीचा धंदा

ऋषभ उर्फ लालू हा जुना गुन्हेगार असून त्याच्यावर शहरातील विविध पोलीस ठाण्यात दुचाकी चोरीसह इतर चोरीचे एकूण 15 गुन्हे दाखल आहे. मात्र, या चोऱ्या पोटापाण्यासाठी नाही तर प्रेयसी आणि स्वतःच्या गरजा (शौक) पूर्ण करत असल्याची कबुली त्याने पोलिसांना दिली आहे.

### वडील आजारी असल्याचं सांगून दुचाकी विक्री

विशेष म्हणजे चोरलेल्या दुचाकी विकताना मात्र तो जबरदस्त ॲक्टिंग करायचा. वडिलांना



कॅन्सरचा आजार जडला आहे, त्यांच्यावर उपचार करण्यासाठी, त्यांच्या औषधांसाठी पैशांची गरज आहे, असे सांगून तो दुचाकी आणि इतर चोरलेल्या वस्तूंची विक्री करायचा किंवा गहाण ठेवत होता.

### जेलमधून सुटताच पुन्हा चोरी

ऋषभ उर्फ लालू असोपा हा अनेक वर्षांपासून दुचाकी चोरीच्या क्षेत्रात सक्रिय असल्याने त्याला अनेक वेळा अटकही झाली. काही महिन्यांपूर्वी सुध्दा त्याला दुचाकी चोरीच्या आरोपाखाली पोलिसांनी अटक केली होती. मात्र, कारागृहातून सुटका होताच तो पुन्हा वाहन चोरीच्या कामाला लागला होता.

### प्रेयसी मला सोडवेल असा विश्वास

आताही सीताबर्डी पोलिसांनी ऋषभ उर्फ लाडूला अटक केल्यानंतर त्याची लवकरच सुटका होईल असा त्याला विश्वास आहे. माझी प्रेयसी मला नक्कीच सोडवेल माझ्या जामिनासाठी चांगला वकील करेल, असा विश्वास ऋषभला आहे.

## तरुणीवर बलात्कार करून खंडणी उकळली, दोघांना अटक

पुणे - फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन एका तरुणीवर बलात्कार करून खंडणी उकळल्याप्रकरणी चंदनगर पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. सिद्धार्थ मधुकर श्रीखंडे (वय 22) आणि आशिष विजय कांबळे (वय 23) दोघे रा. थिटे वस्ती, खराडी अशी आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी खराडी येथील एका 23 वर्षीय तरुणीने फिर्याद दिली आहे. हा प्रकार खराडी परिसरातील डब्ल्युटीसी सेंटर, वाघोलीतील खांदवेनगरमधील कृष्णा लॉज येथे जून 2021 ते 20 मे 2022 दरम्यान घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सिद्धार्थ



हा फिर्यादीच्या मैत्रिणीचा पती आहे. त्याने फिर्यादीला इन्स्टाग्राम अकाऊंटवरून मेसेज करून, फिर्यादी यांना मोबाईलवर फोन करून तू मला खूप आवडतेस, असे म्हणून तिला कारने वेगवेगळ्या ठिकाणी फिरायला नेले. तेथे तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. दरम्यान यावेळी फिर्यादीचे नग्न फोटो व व्हिडिओ काढले. ते फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तिच्याकडून वेळोवेळी 17 हजार रुपये उकळले. तसेच, सिद्धार्थचा मित्र आशिष कांबळे याने फिर्यादीला धमकी देऊन तिच्यासोबत शरीर संबंध प्रस्थापित केले. सतत होणारा अत्याचार आणि पैशांची मागणी याला कंटाळून शेवटी तरुणीने पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून सिद्धार्थ मधुकर श्रीखंडे (वय 22) आणि आशिष विजय कांबळे (वय 23) दोघे रा. थिटे वस्ती, खराडी यांना अटक केली.

## राज्यसभेसाठी शिवसेनेच्या उमेदवाराला काँग्रेस पाठिंबा देणार - नाना पटोले

मुंबई - राज्यसभेच्या सहाव्या जागेसाठी सध्या शिवसेना आणि छत्रपती संभाजीराजे यांच्यात चर्चा सुरू असली तरी राज्यसभेच्या सहाव्या जागेसाठी शिवसेना उमेदवार देईल त्याला काँग्रेसकडूनही पाठिंबा असेल, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी स्पष्ट केल आहे. छत्रपती संभाजी राजे यांच्या विषयी काँग्रेसला देखील आदर आहे. मात्र, यावेळी शिवसेनेच्या उमेदवाराला पाठिंबा असून, याआधी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा देण्यात आला होता. मात्र, पुढच्या वेळेस काँग्रेसच्या उमेदवाराला तो अधिकार असेल असे संकेतही नाना पटोले यांनी आज दिले.

काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक आज दादर येथील टिळक भवन कार्यालयात पार पडत असून यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी हे वक्तव्य केले. कोणाला उमेदवारी द्यायची हा शिवसेनेचा अधिकार -



राज्यसभेच्या सहाव्या जागेसाठी कोणाला उमेदवार करायचे हा शिवसेनेचा अधिकार आहे. मात्र, उमेदवार ठरवत असताना शिवसेनेने काँग्रेसची भूमिका जाणून घ्यावी. तसेच, छत्रपती संभाजीराजे यांच्या उमेदवारीबाबत शिवसेनेने निर्णय घेण्याची गरज आहे. मात्र, शिवसेना जो निर्णय घेईल त्याला आमचा पाठिंबा असेल, असे नाना पटोले यांनी स्पष्ट केल.ओबीसीच्या आरक्षण प्रकरणात ॲडव्होकेट जनरलच्या चुका - राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होतील. मात्र, या निवडणुका ओबीसी आरक्षणासहित व्हाव्यात यासाठी महाविकास आघाडी प्रयत्न करत आहे. याआधीही ओबीसी समाजाला राजकीय आरक्षण लागू व्हावे यासाठी राज्य सरकारकडून कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या होत्या. मात्र, या कायदेशीर तरतुदी करताना राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांनी चुका केल्या असल्याची टीका नाना पटोले यांनी केली.

## गुन्ह्यातील साक्ष मागे घेण्यासाठी गाडीत ठेवले ड्रग्स

उल्हासनगर शहरात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गुन्ह्यातील साक्ष मागे घेण्यासाठी एका दुचाकीत ड्रग्स ठेवण्यात आले होते. गाडीत ड्रग्स असल्याची पोलिसांना माहिती देणारेच आरोपी असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी उल्हासनगर मध्यवर्ती पोलिसांनी चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दुचाकीत ड्रग्स असल्याची माहिती उल्हासनगर मधील बांधकाम व्यावसायिक नंदलाल वाधवा यांनी पोलिसांना दिली होती. नंदलाल वाधवा आणि त्याचा मुलगा राम वाधवा या दोघांनी आपल्या इतर दोन साथीदारांच्या मदतीने रवी तलरेजा या तरुणाच्या दुचाकीमध्ये ड्रग्स ठेवल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी उल्हासनगर मध्यवर्ती पोलिसांनी राम, नंदलाल वाधवा आणि इतर दोन जणांविरोधात एन. डी. पी एस ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तसेच राहुल शर्मा याला अटक केली आहे. तसेच तीन जणांचा पोलीस शोध घेत आहेत. 28 एप्रिलला रवी तलरेजा या तरुणाच्या नंबर प्लेट नसलेल्या दुचाकी वाहतूक पोलिसांनी कारवाई करत वाहतूक कार्यालयात आणल्या होत्या. मात्र पोलीस दुचाकी पोलीस ठाण्याला आणल्यानंतर बांधकाम व्यावसायिक नंदलाल वाधवा तिथे आला आणि दुचाकीत ड्रग्स असल्याचे पोलिसांना सांगितले. त्यावेळी दुचाकीच्या डिक्कीत ड्रग्स चे पॅकेट पोलिसांना आढळले. यात मध्यवर्ती पोलिसांनी खोलवर तपास केल्यानंतर हे ड्रग्स नंदलाल वाधवा आणि त्याचा मुलगा राम वाधवा यांनीच आपल्या साथीदारांच्या मदतीने रवी तलरेजा याच्या दुचाकीत ड्रग्स ठेवल्याचे पोलीस तपासात समोर आले.

रवी यांचे वडील राजेश तलरेजा यांच्या जमिनीच्या व्यवहारात वाधवा पिता पुत्रांनी खोटे कागदपत्रे तयार केली होती. त्या प्रकरणात राजेश यांनी नंदलाल आणि राम वाधवा यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात साक्ष दिली होता, ही साक्ष मागे घ्यावा यासाठी राम आणि नंदलाल हे राजेश तलरेजा यांच्यावर विविध मार्गाने दबाव आणत होते. अखेर साक्ष मागे घेत नसल्याने वाधवा पिता पुत्राने राजेश यांच्या मुलगा रवी याच्या गाडीत ड्रग्स ठेऊन त्याला अडकवण्याचा प्रयत्न केला होता. हा सगळा बनाव त्यांनी फिल्मी स्टाईल ने केला होता. अखेर पोलिसांनी राम आणि नंदलाल या पिता पुत्राचा बनाव समोर आणला. या प्रकरणी मध्यवर्ती पोलिसांनी राहुल शर्मा याला अटक केली असून त्याला 23 मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर अधिक तपास पोलीस करत आहेत.

## आग्रीपाडा परिसरात 8 वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार, आरोपीला अटक

**मुंबईतील आग्रीपाडा परिसरात राहणाऱ्या आठ वर्षीय मुलीवर 38 वर्षीय व्यक्तीकडून लैंगिक अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी आग्रीपाडा पोलिसांकडून पॉस्को कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

मुंबई - मुंबईतील आग्रीपाडा परिसरात राहणाऱ्या आठ वर्षीय मुलीवर 38 वर्षीय व्यक्तीकडून लैंगिक अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी आग्रीपाडा पोलिसांकडून पॉस्को कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पीडित मुलगी आपल्या आजीसोबत आग्रीपाडा येथे रहाते.

चिमुरडी आईस्क्रीम आणण्यासाठी इमारतीखाली आली होती. ही संधी साधून 38 वर्षीय आरोपीने तिच्यावर अत्याचार केला.

बराच वेळ होऊनही नात घरी न परतल्याने आजीने तिचा शोध घेतला. त्यावेळी ती चिमुरडी परिसरातील गणराज इमारतीखाली शांत उभी असल्याचे आजीला दिसले. आजीने मुलीला घरी



नेत विचारपूस केली असता ती जोराने रडू लागली. यावरून आजीला काही तरी अनुचित घडल्याचा संशय आला. आजी आणि शेजारच्यांनी त्या मुलीला विश्वासात घेतले असता परिसरात राहणाऱ्या व्यक्तीने अत्याचार केल्याची माहिती तिने दिली.आजीने पोलिसांना या प्रकाराची माहिती दिली. पोलिसांनी या प्रकरणी तक्रार दाखल करत काही तासांच्या आत 38 वर्षीय आरोपीस अटक केली. आरोपीवर याआधी पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान पीडित मुलीची नायर रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केली असता तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे उघडकीस आले. या प्रकरणात पुढील तपास आग्रीपाडा पोलीस करत आहेत.

## नांदेड : व्यापाऱ्याकडून ९९ लाखांची खंडणी उकळली, दोघे जेरबंद



नांदेड : शहरातील एका व्यापाऱ्याकडून ९९ लाखाची खंडणी उकळल्याचा प्रकार उघड झाला असून,

या प्रकरणातील दोन खंडणीखोरांना आर्थिक गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली आहे.

शहरातील एका व्यापाऱ्याने भाग्यनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यात म्हटले की मी स्वतःच्या नावावर महापालिका हद्दीमध्ये प्लाॅट खरेदी केला होता. तो प्लाॅट नगर भूमापन व महापालिका कार्यालयात माझ्या नावे परिवर्तन करून प्लाॅटभोवती तारेचे कुंपन आणि सिमेंटचे खांब लावले होते. दरम्यान आरोपी ओमसिंह दयालसिंह ठाकूर व त्याचे दोन साथीदार यांनी २०१९ मध्ये बनावट सौदाचिठ्ठीचा आधार घेऊन माझ्या प्लॉटवर सुरु असलेल्या प्लॉटवर अडथळा निर्माण करून दहशत निर्माण केली. तसेच माझ्याकडून आरोपींनी ९९ लाख रुपयांची खंडणी वसुल केली आहे. या तक्रारीनुसार भाग्यनगर पोलिस ठाण्याच गुन्हा नोंद करण्यात आला होता. खंडणी प्रकरणातील आरोपी रविंद्रसिंघ लक्ष्मणसिंघ जंगी (रा. शहीदपुरा नांदेड) व ओमसिंह दयालसिंह ठाकूर (रा. जुना मोंढा) यांना आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी अटक केली आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक माणिक बेंद्रे, सहायक पोलिस निरीक्षक महादेव मांजरमकर, पोलिस उपनिरीक्षरक श्री, गोटके आदींनी केली.

## 8 व्या राष्ट्रीय तांग सु डो चॅम्पिअनशिप स्पर्धेत मिरा भाईंदर मधील कराटेपटूंची चमकदार कामगिरी

### सहा वर्षाच्या समर्थ तांबेची सुवर्ण झेप






प्रतिनिधी: आय. टि. एफ. तांग सु डो स्पोर्ट्स फेडेरेशन ऑफ इंडिया आणि दिल्ली ऑलिम्पिक असोसिएशन मान्यताप्राप्त ८वी राष्ट्रीय तांग सु डो चॅम्पिअनशिप (कोरियन कराटे) स्पर्धा दिनांक १३ ते १५ मे ला दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती. स्पर्ध्येसाठी देशभरातून १६ राज्यातून ४५० पेक्षा जास्त खेळाडूंनी सहभाग घेतला होता. महाराष्ट्र राज्याला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

मिरा-भाईंदर मधील स्पोर्ट्स इंडिया कराटे अकॅडमिचा अवघ्या सहा वर्षाचा खेळाडू समर्थ वैभव तांबे याने १ सुवर्ण आणि १ रजत पदक जिंकून समस्त महाराष्ट्रवासियांची मान अभिमानाने उंच केली आहे. यासोबतच अंकुश विश्वकर्मा (२ सुवर्ण १ रजत), सुविधा कदम (२ रजत १ कास्य), भीम राजभर (१ रजत), सचिन चव्हाण (१ कास्य), आकाश राजभर (१ रजत १ कास्य), शुशांक कदम (१ कास्य), रिवांश सुजेरा (१ रजत), तनिष्का गुप्ता (१ रजत) या खेळाडूंनी लक्षवेधी कामगिरी केली आहे. मास्टर विनोद कदम यांनी सर्व खेळाडूंची मागील २ ते ३ महिन्यापासून विशेष तयारी करून घेतली होती . खेळाडूंना मास्टर सुभाष मोहिते, मास्टर रॉकी डिसोझा यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व खेळाडूंचे आश्रय सामाजिक संस्थेतर्फे अध्यक्ष दीपक नाईक यांनी कौतुक केले आणि भविष्यातील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

## उपजीविकेसाठी तरूणांकडून डोंबिवली, कल्याणमध्ये सोनसाखळी चोरीचा धंदा

नोकरी, कामधंदा नसल्याने उपजीविकेसाठी भिवंडीतील दोन तरूण कल्याण, डोंबिवली परिसरात सोनसाखळी चोरीचा धंदा मागील अनेक महिन्यांपासून करत होते. ज्येष्ठ नागरिक, महिला, पादचाऱ्यांना लक्ष्य करून सोनसाखळी, मंगळसूत्र, गंठण चोरण्याचे प्रकार या परिसरात वाढले होते या दोन्ही आरोपींना मानपाडा पोलिसांकडून अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून १६ लाखाचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

रमेश पालीवाल (३४, रा. पद्मा चाळ, वऱ्हाड देवी, भिवंडी), महेश जठ (रा. लक्ष्मी दर्शन इमारत, कोंबडपाडा, शिवाजी चौक, भिवंडी) अशी अटक आरोपींची नावे आहेत. दोन्ही आरोपी मुळचे राजस्थान येथील रहिवासी आहेत. रमेश पालीवाल सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर २९ सोनसाखळी चोरीचे गुन्हे ठाणे, पालघर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात दाखल आहेत. कल्याणमधील खडकपाडा, कोळसेवाडी, बाजारपेठ, डोंबिवलीतील मानपाडा, टिळकनगर, विष्णुनगर पोलीस ठाणे हद्दीत त्यांनी गेल्या काही महिन्यात सोनसाखळी चोरीचे नऊ गुन्हे केले आहेत.



### 16 लाखांचा ऐवज मानपाडा पोलिसांकडून जप्त

#### चोरीच्या घटनांमध्ये वाढ

मानपाडा पोलीस ठाणे हद्दीत वर्दळीच्या ठिकाणी पादचाऱ्यांना लुटणे, महिलांच्या गळयातील सोन्याचा ऐवज लुटून नेण्याच्या घटना वाढल्या होत्या. मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश वनवे, अनिल भिसे, सुनील तारमळे, हवालदार राजेंद्र खिलारे, विजय कोळी , दीपक गडगे, प्रवीण किनरे, महादेव पवार, यल्लप्पा पाटील, प्रशांत वानखेडे, महेंद्र मंझा, अशोक काकोडे, सुशांत तांबे, संतोष वायकर, सोमनाथ टिकेकर, भानुदास काटकर, संजु मिसाळ यांची पाच पथके गेल्या महिन्यापासून मानपाडा पोलीस ठाणे हद्दीतील कल्याण-शिळफाटा रस्ता, घरडा सर्कल, एमआयडीसी, निवासी विभाग, मानपाडा रस्ता भागात गस्त घालत होते.

#### पाळत ठेवत आरोपीस अटक

एका पादचारी महिलेच्या गळयातील सोन्याचा ऐवज लुटल्याची तक्रार मानपाडा पोलीस ठाण्यात दाखल होती. त्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी त्या भागातील सीसीटीव्ही चित्रण तपासले. त्यात दोन जण दुचाकीवरून सोनसाखळी हिसकावून पळून जात असल्याचे दिसत होते. पोलिसांनी या दुचाकीचा वाहन क्रमांक आणि त्यावरील स्वारांची ओळख पटविली.

दोन्ही आरोपी भिवंडीतील असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी भिवंडी भागात पंधरा दिवस पाळत ठेवली. विविध वस्त्यांमध्ये आरोपींचा शोध घेतला. या तपासणीतून रमेश पालीवाल, महेश जठ पोलिसांच्या तावडीत सापडले.

चोरी केलेले दागिने दोघे सोनाराना विकत होते. हे दागिने घरातील आहेत असे ते सांगत होते. नोकरी, कामधंदा नसल्याने उपजीविकेसाठी आपण या चोऱ्या करत होतो, अशी कबुली आरोपींनी पोलिसांना दिली.

#### ऐवजासह दुचाकीही जप्त

पोलिसांनी त्यांच्याकडून १५ लाख २५ हजार रूपये किमतीचे ३०५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि चोरीसाठी वापरलेली होंडा कंपनीची दुचाकी जप्त केली आहे. सहपोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे, पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ, साहाय्यक पोलीस आयुक्त जय मोरे यांनी पाचही पथकांचे कौतुक केले आहे

## हॉटेलमध्ये बसून जेवण देण्यास नकार ग्राहक-हॉटेल कर्मचाऱ्यांमध्ये राडा




रात्री हॉटेल बंद असताना हॉटेल मध्ये जाऊ देत नाही, याचा राग आल्याने ग्राहकाने हॉटेलच्या वॉचमन वर चाकूने हल्ला केला. त्यानंतर संतप्त हॉटेल कर्मचाऱ्यांनी ग्राहकाला बेदम मारहाण केल्याची घटना कल्याण परिसरात घडली. या मारहाणीचा संपूर्ण प्रकार सीटीव्हीत कैद झाला आहे. याप्रकरणी खडकपाडा पोलिसांनी परस्पर विरोधी गुन्हा दाखल करत पुढील तपास सुरू केला आहे दोन्ही ग्राहकांची वॉचमनला बेदम मारहाण

कल्याण पश्चिम येथे नामांकीत पॅराडाईज हॉटेल आहे. रात्री एक वाजताच्या सुमारास हे हॉटेल बंद झाले असताना त्या ठिकाणी शार्दुल काळे व मयूर बर्गे नामक दोन व्यक्ती हॉटेलमध्ये जेवणासाठी आले. मात्र हॉटेलच्या बाहेर उभा असलेल्या महेश गुप्त नामक वॉचमेन व इतर कर्मचाऱ्यांनी हॉटेल बंद आहे, फक्त पार्सल मिळेल असे सांगितल्यावर संतप्त झालेल्या शार्दुल काळे व मयूर बर्गे या दोन्ही ग्राहकाने वॉचमनला बेदम मारहाण करत त्याच्यावर चाकूने हल्ला केला. रक्तबंबाळ वॉचमनला पाहून हॉटेलमधील वेटर व इतर कर्मचाऱ्यांनी मिळून या दोन्ही ग्राहकांना बेदम मारहाण केली. या घटनेत ग्राहक व वॉचमन दोन्ही गंभीर जखमी झाले असून पोलिसांनी परस्पर विरोधी गुन्हा दाखल करतात तपास सुरू केला असून मारहाणीचा हा सर्व प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898